मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय विस्तार इमारत ,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी - ०२२ २२८२०६७५ Email:so.visayo२@maharashtra.gov.in

---

क्रमांक:बारटी-२०२६/प्र.क्र.१०१/विसयो दिनांक: २३ ऑक्टोबर,२०२६

प्रति,

महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्र शिक्षण संस्था (बार्टी),
पुणे.

**विषय :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेकडे २०२३ या वर्षाकरिता अर्ज केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांपैकी पात्र संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती योजनेचा लाभ देण्याबाबत.

**संदर्भ :**

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२३/प्र.क्र. ६०(४)/बांधकामे, दि. ३०.१०.२०२३.
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२३/प्र.क्र. ६०(४)/बांधकामे, दि. ०१.०७.२०२६.
३. बार्टी कार्यालयाचे जा.क्र./बार्टी-पुणे/BANRF अधिछात्रवृत्ती/विद्यार्थी निवेदन/२०२६-२०२७/५४७०, दि.०३.०९.२०२६ रोजीचे पत्र.
४. बार्टी कार्यालयाचे जा.क्र./बार्टी-पुणे/BANRF अधिछात्रवृत्ती/विद्यार्थी निवेदन/२०२६-२०२७/६४६६, दि.१६.१०.२०२६ रोजीचे पत्र.

**महोदया,**

विषयांकित प्रकरणी बार्टी संस्थेच्या संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये बार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या सन २०२३ या वर्षीच्या अधिछात्रवृत्ती करिता कायम नोंदणी झालेल्या सर्व प्राप्त अर्जानुसार विद्यार्थ्यांना सरसकट अधिछात्रवृत्ती अदा करण्यासंबंधी शासन स्तरावरुन निर्णय होण्यासाठी विनंती केली आहे.

सदर संदर्भाधीन क्र. ३ पत्रानुसार नमूद करण्यात येते की, महाज्योती संस्थेमार्फत सन २०२३ या वर्षीची MJPRF-२०२३ ही अधिछात्रवृत्ती योजना व सारथी संस्थेमार्फत सन २०२३ या वर्षीची

CSMNRF-२०२३ ही अधिछात्रवृत्ती योजना राबविण्यात आलेली आहे. महाज्योती संस्थेने MJPRF-२०२३ या अधिछात्रवृत्तीसाठी दि. १ जानेवारी, २०२२ ते २० ऑगस्ट, २०२३ एवढा कार्यकाळ निश्चित केला असून पीएच.डी करिता कायम नोंदणी झालेल्या १४५३ विद्यार्थ्यांपैकी ८७० पात्र संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे. तसेच, सारथी संस्थेने CSMNRF-२०२३ अधिछात्रवृत्तीसाठी दि. २५ मार्च २०२२ ते १० जून २०२३ एवढा कार्यकाळ निश्चित केला असून नोंदणी केलेल्या १३२९ विद्यार्थ्यांपैकी ९६९ पात्र संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने सरसकटपणे अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे. त्याच धर्तीवर आता बार्टी संस्थेकडे विविध विद्यार्थी संघटना निवेदनाद्वारे सन २०२३ च्या अधिछात्रवृत्ती योजनेकरिता संशोधक विद्यार्थ्यांना सरसकट लाभ देण्याची विनंती करत आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेता,डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेकडे २०२३ या वर्षाकरिता असलेल्या अधिछात्रवृत्ती योजनेसाठी अर्ज केलेल्या ३१८ संशोधक विद्यार्थ्यांपैकी पात्र संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती योजनेचा लाभ मंजूर करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

आपली,

श्रु. सं. तोरस्कर

(श्रुती तोरस्कर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत** : कार्यासन विसयो, संग्रहार्थ.